# मिरा भाईंदर महानगरपालिका

## आस्थापना विभाग

मुख्यालय, पहिला मजला, स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर(प.)

जा.क्र.मनपा/आस्था/३२२५/2024-25 दि.२७/०२/2025

//परिपत्रक//

दि. 08 मार्च आंतरराष्ट्रीय जागतिक महिला दिनानिमित्त महिला व बालकल्याण विभागामार्फत महिला दिन सप्ताह **दि.08/03/2025 व दि.10/03/2025 ते 13/03/2025 या कालावधीत** साजरा करण्यात येणार असुन सदर सप्ताहामध्ये मनपा महिला अधिकारी/स्थायी, अस्थायी कर्मचारी वर्ग तसेच सर्व ठेका सफाई कामगार महिला यांची नमुद कालावधीमध्ये भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय, मिरारोड येथे सकाळी 10.00 ते सायं 4.00 वाजेपर्यत खालीलप्रमाणे वैद्यकिय तपासणी विनामुल्य करण्यात येणार आहे.

| | | |
|---|---|---|
| • CBC - (कम्प्लीट ब्लड काउंट) चाचणी | • RBS(Sugar test) | • LFT (Liver Function Test) |
| • TSH (Thyroid Stimulating Hormone) | • S.Creatinine (मूत्रपिंडाच्या कार्याचे मूल्यांकन) | • HBA1c (हिमोग्लोबिन चाचणी) |
| • USG अल्ट्रासाऊंड किंवा सोनोग्राफी (As per need) | • Cervical Acetic acid test/ v PAP smear (गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाची तपासणी) | • Blood Pressure(रक्तदाब) |

तसेच दि.11/03/2025 रोजी आप्पासाहेब धर्माधिकारी सभागृह, दुसरा मजला, आरक्षण क्र.241, सेव्हन इलेव्हन स्कुलच्या बाजुला, मिरारोड - पूर्व येथे दु.2.00 ते संध्या 6.30 वा.पर्यत **महिलांचे विशेष संमलेन आयोजित करणेत आले असुन सदर संमेलनात** लैंगिक तक्रार निवारण समिती(विशाखा समिती) बाबत चर्चा सत्र, SIP बचत /गुंतवणुक अर्थ, फायदे व कार्य बाबतची माहिती तसेच महानगरपालिकेच्या महिला आरोग्य अधिकारी यांचे मार्फत महिलांच्या आरोग्य विषयक होणाऱ्या समस्या/उपाययोजना बाबत मार्गदर्शन व मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजने अंतर्गत सर्वाधिक **लाभार्थी नोंदणी केलेल्या महिला तसेच विविध उद्योग क्षेत्रामध्ये कौशल्यपूर्ण कामे केलेल्या महिलांचा** सन्मानचिन्हे देवून गुणगौरव करण्याचे योजले आहे. तसेच **महिलांच्या सुप्त गुणांना मनोरंजनाव्दारे वाव देणेकामी मनपा** महिला शिक्षक वर्ग, मनपा अधिकारी/कर्मचारी, आशा सेविका, बचत गट महिला, अंगणवाडी शिक्षिका, उदयोगिनी महिला, ठेका कामगार महिला व इतर ठेका महिला कर्मचारी याचे समवेत विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले असुन महिलांकरिता आकर्षक भेटवस्तु देण्यात येणार आहे.

तरी सदर कार्यक्रमास आपल्या अधिनस्त महिला कर्मचारी वर्गास निश्चित केलेल्या वेळेमध्ये उपस्थित राहणेबाबत सर्व विभागप्रमुख/खातेप्रमुख यांनी आपल्या स्तरावर आदेशित करावे.

**विशेष सुचना :- सर्व महिला कर्मचारी वर्ग यांना येणे-जाणेकरिता परिवहन बससेवा उपलब्ध करण्यात आलेली आहे.**

कल्पिता पिंपळे
उपायुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :- सर्व विभागप्रमुख/खातेप्रमुख, मिरा भाईंदर महानगरपालिका.